सकाळ



तळसंदे : येथे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा जनजागृती' कार्यक्रमात पारितोषिक वितरणप्रसंगी वसंत पंदारकर, अजय देशपांडे, डॉ. के. प्रथापन आदी.

# 'सायबर शिक्षा'चे पारितोषिक वितरण

घुणकी, ता. १६ : तळसंदे (ता. हातकणंगले) येथील डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबवलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा जनजागृती' उपक्रमाचा पारितोषिक वितरण समारंभ व सायबर वॉरियर्स म्हणून काम करणाऱ्या स्वयंसेवकांचा कौतुक सोहळा झाला.

प्रमुख पाहुणे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक वसंत पंदारकर, आय. ई. आय. कोल्हापूर स्थानिक केंद्राचे अध्यक्ष अजय देशपांडे उपस्थित होते. ''सायबर सुरक्षा जनजागृती'' उपक्रमांतर्गत सुमारे ९० शाळा व महाविद्यालये, तसेच समाजातील विविध घटनांमध्ये कार्यक्रम आयोजित केले गेले. उपक्रमात सकाळ व यीन यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. कुलगुरू डॉ. के. प्रथापन यांनी यांनी मनोगत व्यक्त केले. सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या कार्यक्रमांतर्गत विविध प्रवर्गानुसार क्विक हिल फाउंडेशनकडून विद्यार्थ्यांची निवड केली. यामध्ये बेस्ट प्रोसेस कंपायलन्स गटातून श्रद्धा लांडे, सृष्टी पाटील, श्रुती वडर, सिद्धी कुंभार. हायेस्ट ऑफलाईन आऊट रिच गट-समृद्धी वाघरे, विधी चोपडे, मोहम्मद अली मकडी, साची म्हात्रे. हायेस्ट ऑनलाईन आउट रिच गट - सानिका परीट, संचिता कलास्कर, अभिषेक गोडबोले, तन्मय कांबळे यांची निवड करून त्यांना बक्षीस दिले.